# ठाण्याशेजारी उभारणार



# 'नवे ठाणे'!



## महत्त्वाकांक्षी प्रकल्पास मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदील

**खास प्रतिनिधी**
मुंबई

नवी मुंबईच्या धर्तीवर सुमारे १०० चौरस किलोमीटर जागेवर, ठाणे खाडीच्या दोन्ही बाजूंस नियोजनबद्धरीत्या नव्या ठाणे शहराची उभारणी केली जाणार आहे. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गुरुवारी या प्रकल्पास हिरवा कंदील दाखविला.

शहरातील वाहतूक कोंडीवर मात करण्याबरोबरच खाडी किनाऱ्याचे संवर्धन आणि नव्या ठाण्याची निर्मिती याबाबत ठाणे महापालिकेने एका विकास प्रकल्पाची आखणी केली आहे. ठाणे पालिकेचे आयुक्त आर. ए. राजीव आणि या प्रकल्पाचे सल्लागार ने-पोलिसन या बेल्जियमस्थित कंपनीचे क्रिस पोलिसन यांनी गुरुवारी मंत्रालयात मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासमोर या प्रकल्पाचे सादरीकरण केले. खाडीचे सुशोभीकरण व संवर्धन करण्याबरोबरच खाडी किनाऱ्याच्या पूर्वेला सुमारे १०० चौरस किलोमीटर क्षेत्रफळामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या नवीन शहराची संकल्पना यावेळी मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्यात आली. ठाणे खाडीच्या पूर्वेला भिवंडीकडे नवा बायपास रस्ताही या प्रकल्पात प्रस्तावित करण्यात आला आहे.

यावेळी, बहुउद्देशीय वाहतूक आराखडा आणि बायपास रोड वेगवेगळे न करता त्याचा एकात्मिक आराखडा बनवावा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीए आणि ठाणे महापालिकेला दिल्या. तसेच खाडीच्या पूर्वेला नवीन शहर निर्माण करण्याची संकल्पना मूर्त स्वरूपात उतरावी यासाठी एमएमआरडीए आणि सिडको यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

या प्रकल्पामुळे केवळ ठाण्यात नाही तर राज्यात विकासाचे नवे मॉडेल निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बैठकीस नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव टी. सी. बेंजामिन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त राहुल अस्थाना, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अजितकुमार जैन, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव मनुकुमार श्रीवास्तव, पर्यावरण विभागाच्या सचिव श्रीमती वल्सा नायर सिंग आदी उपस्थित होते.